<u>सर्वात महत्त्वाच्या अटी आणि शर्ती</u>

आयडीबीआय बँक क्रेडिट कर्ड

"सर्वात महत्त्वाच्या अटी आणि शर्ती" ("MITC") या आयडीबीआय बँकेच्या (IDBI Bank) सर्व क्रेडिट कार्ड्स/कार्डधारक/क्रेडिट कार्डसाठी अर्ज करणारे/बँकेचे ग्राहक/आणि बँकेच्या क्रेडिट कार्ड उत्पादनामध्ये रस दाखवणाऱ्या सामान्य जनतेला लागू आहेत. बँकेच्या विवेकबुद्धीनुसार आणि वेळोवेळी लागू होणाऱ्या कायद्यांनुसार 'MITC' मध्ये बदल केले जाऊ शकतात. या अटी आणि शर्ती, कार्डधारक कराराच्या ("Cardholder Agreement") अटी व शर्तींव्यतिरिक्त असून त्यासोबतच वाचल्या जाव्यात. या 'MITC' आणि 'कार्डधारक करार' यांच्यात काही विसंगती आढळल्यास, खाली तसे स्पष्टपणे नमूद केले नसल्यास, 'कार्डधारक करार' अंतिम (मान्य) मानला जाईल.येथे वापरलेले परंतु स्पष्टीकरण न दिलेले सर्व शब्द, कार्डधारक करारांतर्गत दिलेल्या अर्थानुसारच समजले जातील.

क) <u>शुल्क आणि आकारणीचे वेळापत्रक</u>

अ) प्रवेश शुल्क आणि वार्षिक सदस्यत्व शुल्क

प्राथमिक आणि ॲड-ऑन क्रेडिट कार्ड(स्) वर जॉइनिंग फी आणि वार्षिक सदस्यत्व शुल्क लागू आहे. ही शुल्के कार्डधारकाने ज्या ऑफरअंतर्गत आयडीबीआय बँकेचे क्रेडिट कार्ड घेतले आहे त्यानुसार बदलू शकतात. लागू असल्यास, कोणत्याही ॲड-ऑन कार्डधारक/धारकांच्या शुल्कांसह ही शुल्के कार्ड जारी करणे / नूतनीकरणाच्या वेळी कार्डधारकाच्या क्रेडिट कार्ड खात्यावर आकारली जातात आणि ज्या महिन्यात ती आकारली जातात त्या महिन्याच्या मासिक क्रेडिट कार्ड स्टेटमेंटमध्ये ती दर्शविली जातील. क्रेडिट कार्ड बंद केल्यास शुल्काचा कोणताही परतावा मिळणार नाही. सध्याचे शुल्क संलग्न शुल्क व आकारणी वेळापत्रकात नमूद केलेले आहेत.

ब) कॅश □डव्हान्स फी

कार्डधारकाला भारतात आणि परदेशात आयडीबीआय बँक किंवा इतर एटीएम मधून चोवीस तास रोख रक्कम मिळवण्याची सुविधा उपलब्ध आहे. अशा सर्व व्यवहारांवर, कॅश ॲडव्हान्स पोस्ट होताना व्यवहाराच्या रकमेच्या २.५% किंवा रु. ५०० यापैकी जे जास्त असेल तेवढे व्यवहार शुल्क आकारले जाईल आणि ते पुढील मासिक स्टेटमेंटमध्ये कार्डधारकाला बिल केले जाईल. व्यवहार शुल्क आयडीबीआय बँकेच्या पूर्ण अधिकारानुसार बदलू शकते. कॅश ॲडव्हान्स व्यवहारांवर, पैसे काढल्याच्या तारखेपासून दररोजच्या बाकी शिल्लक रकमेवर लागू असलेल्या दरानुसार वित्त शुल्क देखील आकारले जाईल. हे वित्त शुल्क बिलिंग सायकलच्या शेवटच्या दिवशी क्रेडिट कार्ड खात्यातून डेबिट केले जाईल.

ख) <u>शुल्क Charges</u>

(i) वेळोवेळी लागू होणारे शुल्क आणि फी, कार्ड सदस्यांना आयडीबीआय बँकेद्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या विशिष्ट सेवांसाठी किंवा कार्ड सदस्याने त्यांच्या कार्ड खात्याशी संबंधित केलेल्या चुकांसाठी, कार्ड सदस्यांकडून देय असतील.

(ii) आयडीबीआय बँक वेळोवेळी कोणतेही शुल्क किंवा फी बदलण्याचा किंवा ग्राहकाला योग्य ती

पूर्वसूचना देऊन, आवश्यक वाटल्यास कोणतेही नवीन शुल्क किंवा फी लागू करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

(iii) कृपया लक्षात घ्या की लागू असलेले अप्रत्यक्ष कर, ज्यामध्ये वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) समाविष्ट आहे, हे आमच्या सर्व शुल्क आणि आकारणींवर तसेच प्रचलित अप्रत्यक्ष करांनुसार करपात्र असलेल्या इतर कोणत्याही रकमेवर वसूल केले जातील.

(iv) किमान देय रक्कम देय तारखेपर्यंत भरली नाही तर उशिरा पेमेंट शुल्क लागू होईल.

(v) एकूण थकबाकी मंजूर केलेल्या क्रेडिट मर्यादेपेक्षा जास्त झाल्यास ओव्हर लिमिट शुल्क लागू होईल.

(vi) सर्व परकीय चलन व्यवहारांसाठी वापरला जाणारा विनिमय दर विजा/ मास्टरकार्ड/ रुपे आणि आयडीबीआय बँक ठरवतील आणि तो कार्डधारकावर बंधनकारक असेल. सर्व आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी क्रॉस-करन्सी रूपांतरण दरावर अतिरिक्त ३.५% मार्क-अप आकारला जाईल.

क) व्याज मुक्त कालावधी

व्याजमुक्त क्रेडिट कालावधी १८ ते ४८ दिवसांपर्यंत असू शकतो, जो संबंधित क्रेडिट कार्डवर लागू असलेल्या योजनेवर (कृपया शुल्क आणि आकारणींचे वेळापत्रक पहा) आणि व्यापाऱ्याने दावे सादर करण्यावर अवलंबून असतो. तथापि, मागील महिन्याची थकबाकी पूर्णपणे भरलेली नसल्यास किंवा कार्डधारकाने एटीएममधून रोख रक्कम काढली असल्यास हे लागू होणार नाही.

उदाहरणार्थ: २१ जून ते २० जुलै या कालावधीतील स्टेटमेंटसाठी, पेमेंटची देय तारीख ०७ ऑगस्ट असेल असे गृहीत धरले की आपण मागील महिन्याच्या स्टेटमेंटमधील आपली एकूण देय रक्कम (टोटल अमाऊंट ड्यू) पेमेंटच्या देय तारखेपर्यंत भरली आहे, तर व्याजमुक्त कालावधी असा असेल:

१. २१ जून रोजी केलेल्या खरेदीसाठी, व्याजमुक्त कालावधी २१ जून ते ०७ ऑगस्ट म्हणजेच ४८ दिवसांचा असेल.

२. १४ जुलै रोजी केलेल्या खरेदीसाठी, व्याजमुक्त कालावधी १४ जुलै ते ०७ ऑगस्ट म्हणजेच २५ दिवसांचा असेल. त्यामुळे, खरेदीच्या तारखेनुसार व्याजमुक्त कालावधी बदलू शकतो. तथापि, जर मागील महिन्याची एकूण देय रक्कम पेमेंटच्या देय तारखेपर्यंत भरली गेली नाही, तर मोफत क्रेडिट कालावधी (फ्री क्रेडिट पिरियड) रद्द होईल आणि कोणताही व्याजमुक्त कालावधी उपलब्ध राहणार नाही. कॅश □डव्हान्सेसच्या बाबतीत, व्यवहाराच्या तारखेपासून पेमेंटच्या तारखेपर्यंत व्याज आकारले जाते.

टीप: शुल्क आणि आकारणींच्या वेळापत्रकासाठी कृपया परिशिष्ट (Annexure) पहा.

ग) **<u>वित्त/व्याज/सेवा शुल्क</u>**

(i) कार्ड सदस्याने त्याची शिल्लक पूर्णपणे न भरण्याचा निर्णय घेतल्यास, व्यवहाराच्या तारखेपासून सर्व व्यवहारांवर मासिक टक्केवारी दराने वित्त शुल्क देय असतात, तसेच कार्ड सदस्याने घेतलेल्या सर्व रोख आगाऊ रकमेवर ती परतफेड होईपर्यंत हे शुल्क लागू राहते. देय असल्यास वित्त शुल्क हे जोपर्यंत कार्डावरील थकबाकी पूर्णपणे भरली जात नाही तोपर्यंत कार्ड सदस्याच्या खात्यात डेबिट केले जातात.

(ii) रोख आगाऊ रकमेवरील वित्तीय शुल्क व्यवहाराच्या तारखेपासून संपूर्ण देय रक्कम भरली जाईपर्यंत लागू असते.

(iii) जेव्हा ग्राहक कोणतीही थकबाकी पुढे घेऊन जातो किंवा रोख आगाऊ रक्कम घेतो, तेव्हा दैनंदिन शिल्लक आधारावर गणना केलेले वित्त शुल्क पुढे नेलेल्या शिल्लकीवर तसेच नवीन बिलिंगवर लागू होईल.

(iv) जर कार्डधारक IDBI बँक क्रेडिट कार्डची रिव्हॉल्विंग क्रेडिट सुविधा वापरत असेल आणि त्यामुळे मासिक बिलिंग स्टेटमेंटमध्ये दर्शविलेल्या एकूण देय रकमेपेक्षा कमी रक्कम भरण्याचा निर्णय घेत असेल, तर संपूर्ण थकबाकीवर वित्त शुल्क लागू होईल आणि मागील थकबाकी पूर्णपणे भरली जाईपर्यंत सर्व नवीन व्यवहारांवरही वित्त शुल्क लागू होतील.

(v) किमान देय रक्कम (मिनिमम अमाऊंट ड्यू) देय तारखेपर्यंत भरली गेली नाही तर विलंब शुल्क लागू होईल. किमान देय रक्कम म्हणजे स्टेटमेंटमध्ये तशी नमूद केलेली रक्कम. विलंब शुल्क टाळण्यासाठी देय तारखेपूर्वी किंवा त्या दिवशीच स्पष्ट निधी आयडीबीआय बँक कार्ड खात्यात जमा होणे आवश्यक आहे. विलंब शुल्क खालील प्रमाणे लागू होते -

उशिरा पेमेंट चार्जेस (प्रत्येक प्रसंगी, देय रकमेवर आधारित)	< = ₹५०० – शून्य > ₹५०० ते < = ₹५००० - ₹४०० > ₹ ५००० ते < = ₹१००००- ₹५०० > ₹१०००० ते < = ₹२०००० - ₹७५० > ₹२०००० - ₹९५०

(vi) क्रेडिट मर्यादेपेक्षा जास्त असलेल्या एकूण थकबाकीवर ओव्हर लिमिट शुल्क लागू होईल, जे ओव्हर लिमिट रकमेच्या २.५% दराने असेल आणि किमान ₹ ५०० इतके असेल.

खालील चित्रण विविध शुल्कांची गणना करण्याची पद्धत दर्शवली जाईल -

उदाहरण १: किरकोळ खरेदीवरील व्याज/सेवा शुल्क (थकीत रकमेचे अंशतः भरणे)

समजा तुम्ही मागील सर्व थकीत रक्कम पूर्णपणे भरली आहे आणि तुमच्या आयडीबीआय बँक क्रेडिट कार्डवर कोणतीही थकबाकी नाही. तुमची स्टेटमेंट तारीख दर महिन्याची २० तारीख आहे. खाली तुमच्या कार्ड खात्यावर तुम्ही केलेल्या व्यवहारांची यादी दिली आहे.

दिनांक	तपशील	रक्कम
१० एप्रिल	गृह उपयोगी वस्तूंची खरेदी	₹१५,०००/-
१५ एप्रिल	कपडे आणि ॲक्सेसरीजची खरेदी	₹५,०००/-
२० एप्रिल	स्टेटमेंट तारीख	एकूण देय रक्कम = ₹२०,०००/- किमान देय रक्कम = ₹१,०००/-
०८ मे	पेमेंट देय तारीख	एकूण देय रक्कम = ₹२०,०००/- किमान देय रक्कम = ₹१,०००/-
१२ मे	कार्ड खात्यात पेमेंट (येथे उशिरा केलेल्या पेमेंटसाठी विलंब शुल्क लागू होईल)	₹२,००० (क्रेडिट)
१४ मे	गृह उपयोगी वस्तूंची खरेदी	₹१,०००/-
१५ मे	कार्ड खात्यात पेमेंट	₹१५,००० (क्रेडिट)

अशा प्रकारे, २० मे च्या स्टेटमेंटवर खालील गोष्टी तुम्ही भरावयाच्या एकूण रकमेच्या घटकांप्रमाणे दिसतील:

व्याज गणना = (थकबाकी रक्कम × २.९०%* प्रति महिना × १२ महिने × दिवसांची संख्या) / ३६५

म्हणून,

(a) ₹१५००० वर २.९०% प्रति महिना दराने १० एप्रिल ते ११ मे (म्हणजे ३२ दिवस) व्याज = ₹४५७.६४
₹१३००० वर २.९०% प्रति महिना दराने १२ मे ते १४ मे (म्हणजे ३ दिवस) व्याज = ₹३७.१८
₹५००० वर २.९०% प्रति महिना दराने १५ एप्रिल ते १४ मे (म्हणजे ३० दिवस) व्याज = ₹१४३.०१
₹३००० वर २.९०% प्रति महिना दराने १५ मे ते २० मे (म्हणजे ५ दिवस) व्याज = ₹१४.३०

₹१००० वर (नवीन खर्च @ २.९०% प्रति महिना दराने १४ मे ते २० मे (म्हणजे ६ दिवस)) = ₹५.७२

म्हणून एकूण व्याज ₹६५७.८५ आहे.
उशिरा भरणा शुल्क = ₹७५०
(b) व्याज आणि इतर शुल्कांवर १८% जीएसटी = ₹२५३.४१
(c) थकबाकी असलेली एकूण मूळ रक्कम = ₹ ४००० (₹१००० नवीन खर्च + मागील महिन्याच्या बिलिंग कालावधीतील ₹३००० शिल्लक थकबाकी).
(d) म्हणून एकूण देय रक्कम = (a) + (b) + (c) + (d) = ₹ ५६६१.२६

उदाहरण 2: किरकोळ खरेदीवरील व्याज/सेवा शुल्क (देय तारखेनंतर देयकांची पूर्ण भरपाई)

गृहित धरा की तुम्ही तुमची सर्व मागील देयके पूर्णपणे भरली आहेत आणि तुमच्या आयडीबीआय बँक क्रेडिट कार्ड वर कोणतीही थकबाकी शिल्लक नाही. तुमच्या स्टेटमेंटची तारीख प्रत्येक महिन्याच्या २० तारखेला आहे. खाली तुमच्या कार्ड खात्यावर तुम्ही केलेल्या व्यवहारांची यादी दिली आहे.

दिनांक	तपशील	रक्कम
१० एप्रिल	गृह उपयोगी वस्तूंची खरेदी	₹१५,०००/-
१५ एप्रिल	कपडे आणि ॲक्सेसरीजची खरेदी	₹५,०००/-
२० एप्रिल	स्टेटमेंट तारीख	एकूण देय रक्कम = ₹२०,०००/- किमान देय रक्कम = ₹१,०००/-
०८ मे	पेमेंट देय तारीख	एकूण देय रक्कम = ₹२०,०००/- किमान देय रक्कम = ₹१,०००/-
१४ मे	गृह उपयोगी वस्तूंची खरेदी	₹१,०००/-
१५ मे	कार्ड खात्यात पेमेंट	₹२०,०००/- (क्रेडिट)

अशा प्रकारे, २० मे तारखेच्या स्टेटमेंटवर, तुमच्याकडून देय असलेल्या एकूण रकमेचे घटक खालीलप्रमाणे दिसतील:

व्याज गणना = (थकबाकी रक्कम x २.९०%*दरमहा x १२ महिने x दिवसांची संख्या) / ३६५ त्यामुळे,

(a) ₹ १५००० वर @२.९०%दरमहा ने १० एप्रिल ते १४ मे (म्हणजे ३५ दिवसांसाठी) व्याज = ₹५००.५५

₹५००० वर @२.९०% दरमहा ने १५ एप्रिल ते १४ मे (म्हणजे ३० दिवसांसाठी) व्याज = ₹१४३.०१

₹१००० वर @२.९०% दरमहा ने १४ मे ते २० मे (म्हणजे ६ दिवसांसाठी) व्याज = ₹ ५.७२

अशा प्रकारे एकूण व्याज ₹६४९.२८ आहे

(b) उशिरा पेमेंट शुल्क = ₹७५०

(c) व्याज आणि इतर शुल्कांवर १८% दराने GST = ₹२५१.८७

(d) एकूण थकबाकी मूळ रक्कम = ₹१००० (₹१०००नवीन खर्च).

(e) म्हणून देय एकूण रक्कम = (a) + (b) + (c) + (d) = ₹ २६५१.१५

<u>उदाहरण 3 - कॅश □डव्हान्स व्यवहारांवरील व्याज/सेवा शुल्क:</u>

समजा तुम्ही मागील सर्व देयके पूर्णपणे भरली आहेत आणि तुमच्या आयडीबीआय बँक क्रेडिट कार्डवर कोणतीही थकबाकी नाही. तुमची स्टेटमेंट तारीख प्रत्येक महिन्याची 20 तारीख आहे. खाली तुमच्या कार्ड खात्यात केलेल्या व्यवहारांची यादी दिली आहे.

व्याज गणना = (रोख रक्कम काढणे **x** २.९०%* प्रतिमहिना **x** १२ महिने **x** दिवसांची संख्या) / ३६५

सायकल १: २१ मार्च ते २० एप्रिल

तारीख	व्यवहाराचा प्रकार	रक्कम	तपशील
१० एप्रिल	गृहोपयोगी वस्तूंची खरेदी	₹१५,०००/-	क्रेडिट कार्ड वरील खरेदी
१५ एप्रिल	कपडे आणि अॅक्सेसरीजची खरेदी	₹५,०००/-	क्रेडिट कार्ड वरील खरेदी
१८ एप्रिल	रोख रक्कम काढली	₹१०,०००/-	क्रेडिट कार्ड वरुन रोख रक्कम काढली
१८ एप्रिल	कॅश □डव्हान्स फी	₹५००/-	₹१०,०००*२.५% = ₹२५० जी ₹500 पेक्षा कमी आहे.
१८ एप्रिल	कॅश □डव्हान्स वरील जीएसटी	₹९०/-	₹५००*१८% = ₹९०
२०एप्रिल	व्याज	₹१९.०७	रोख रक्कम काढण्यावरील व्याज ₹१०,०००@ २.९०% दरमहा१८एप्रिल ते २० एप्रिल (म्हणजे २ दिवस) = ₹१९.०७
२०एप्रिल	व्याजावरील जीएसटी	₹३.४३	₹१९.०७*१८% = ₹३.४३
२०एप्रिल	स्टेटमेंटची तारीख	₹३०,६१२.५०	एकूण देय रक्कम

म्हणून, २० एप्रिल च्या स्टेटमेंटमध्ये, तुमच्याकडून देय असलेल्या एकूण रकमेचे घटक खालीलप्रमाणे दिसतील:

२० एप्रिल रोजी देय एकूण रक्कम = ₹३०,६१२.५० आणि किमान देय रक्कम = ₹२११२.५०

सायकल २: २१ एप्रिल ते २० मे

समजा टीएडी पेमेंट 05 मे रोजी केले जाते, तर 20 मे रोजी तयार होणाऱ्या स्टेटमेंटमध्ये खालील घटकांचा समावेश असेल:

दिनांक	व्यवहाराचा प्रकार	रक्कम	तपशील
थकबाकी		₹३०,६१२.५०	मागील स्टेटमेंट नुसार उर्वरीत थकबाकी
५ मे	पेमेंट	₹३०,६१२.५०	मागील संपूर्ण थकबाकी असलेल्या रकमेचा पूर्ण भरणा
१४ मे	गृहपयोगी वस्तूंची खरेदी	₹१,०००/-	क्रेडिट कार्ड वरुन केलेली खरेदी
२० मे	व्याज	₹१३३.४८	₹१०,००० वर रोख रक्कम काढण्यावरील व्याज @ २.९०% प्रतिमहिना २१ एप्रिल ते ५ मे (म्हणजेच १४ दिवसांसाठी) = ₹१३३.४८
२० मे	व्याजावरील जीएसटी	₹२४.०३	₹१३३.४८*१८%= ₹२४.०३
२० मे	स्टेटमेंट ची तारीख	₹११५७.५१/-	एकूण देय रक्कम

कृपया लक्षात घ्या की वित्त शुल्क आणि इतर शुल्के आयडीबीआय बँकेच्या संपूर्ण विवेकाच्या आधिकारानुसार बदलू शकतात. तसेच कृपया लक्षात घ्या की जर कार्डधारकाने खात्याच्या क्रेडिट मर्यादेपेक्षा जास्त वापर केला, तर खात्यावर ओव्हर-लिमिट शुल्क आकारले जाईल. विशिष्ट प्रसंगी आकारली जाऊ शकणाऱ्या शुल्कांच्या यादीसाठी, कृपया या दस्तऐवजाच्या शेवटी उपलब्ध असलेल्या शुल्क व आकारणी वेळापत्रकाचा संदर्भ घ्या.

*** कार्डाच्या प्रकारानुसार व्याजदर बदलतो.**

घ) **मर्यादा**

(i) क्रेडिट मर्यादा – आयडीबीआय बँक आपल्या पूर्ण विवेकाच्या आधाराने कार्ड सदस्याची मर्यादा निश्चित करेल, म्हणजेच क्रेडिट मर्यादा आणि रोख पैसे काढण्याची मर्यादा. (ॲड-ऑन कार्ड सदस्यांना समान मर्यादा सामायिक असते). या मर्यादा कार्ड सदस्याला वेलकम लेटरमध्ये आणि मासिक स्टेटमेंटमध्ये कळविल्या जातात.

(ii) उपलब्ध क्रेडिट मर्यादा - स्टेटमेंट तयार करण्याच्या वेळी उपलब्ध असलेली क्रेडिट मर्यादा मासिक स्टेटमेंटचा एक भाग म्हणून दिली जाते. आयडीबीआय बँक कार्ड सदस्याच्या खात्याचा नियमितपणे आढावा घेईल आणि अंतर्गत निकषांच्या आधारे कार्ड सदस्याची क्रेडिट मर्यादा कमी करण्याचा अधिकार राखून ठेवते. क्रेडिट मर्यादा वाढवू इच्छिणारे कार्ड सदस्य बँकेला पत्र लिहून आणि त्यांचे उत्पन्न जाहीर करणारी आर्थिक कागदपत्रे सादर करून तसे करू शकतात. बँक, पूर्णपणे आपल्या विवेकाधिकाराने आणि सादर केलेल्या अशा नवीन कागदपत्रांच्या आधारे, कार्ड सदस्याची क्रेडिट मर्यादा वाढवू शकते.

(iii) रोख रक्कम काढण्याची मर्यादा – ग्राहकाने निवडलेल्या कार्ड प्रकाराच्या आधारावर रोख रक्कम काढण्याची मर्यादा वेगळी असू शकते. रोख रक्कम काढण्याची मर्यादा २०% ते ७०% पर्यंत असू शकते.

बिलिंग आणि पेमेंटस

(a) (अ) कार्डधारकांच्या खात्यात केलेल्या देयकांचा निपटारा पुढील क्रमाने केला जाईल.

१. व्याज २. कर ३. शुल्क. ४. रोख रक्कम ५. ईएमआय ६. खरेदी (द्या)

(b) ब) आयडीबीआय बँक कार्ड सदस्याला मागील स्टेटमेंटपासून त्यांच्या खात्यात जमा झालेल्या देयकांची आणि डेबिट झालेल्या व्यवहारांची माहिती दर्शविणारे मासिक स्टेटमेंट पाठवेल. बँक दर महिन्याला पूर्वनिर्धारित तारखेला कार्ड खात्यातील व्यवहारांचे स्टेटमेंट बँकेकडे नोंद असलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर / ई-मेल पत्त्यावर पोस्ट / ई-मेलद्वारे पाठवेल तसेच बँकेत नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे मिनी स्टेटमेंटही पाठवेल. तथापि, स्टेटमेंट प्राप्त न झाल्यास कार्डधारकाच्या जबाबदाऱ्या आणि देयकांवर कोणताही परिणाम होणार नाही. जर थकबाकी रक्कम ₹५०/- पेक्षा कमी असेल आणि मागील स्टेटमेंटपासून बिलिंगसाठी कोणताही पुढील व्यवहार प्रलंबित नसेल, तर कोणतेही स्टेटमेंट जारी केले जाणार नाही. कार्डधारकांना त्यांच्या सोयीप्रमाणे क्रेडिट कार्डचे बिलिंग सायकल बदलण्याचा पर्याय किमान एकदा उपलब्ध करून दिला जाईल.

क) आयडीबीआय बँक कार्ड सदस्यांना रिव्हॉल्व्हिंग क्रेडिटची सुविधा प्रदान करते. कार्ड सदस्य स्टेटमेंटवर नमूद केलेली केवळ मिनीमम अमाऊंट ड्यू (एमएडी) भरण्याचा पर्याय निवडू शकतो. उर्वरित थकबाकी पुढील स्टेटमेंटमध्ये पुढे नेली जाऊ शकते. कार्ड सदस्य एकूण देय रक्कम किंवा किमान देय रकमेपेक्षा जास्त कोणतीही रक्कम भरण्याचाही पर्याय निवडू शकतो. असे पेमेंट पेमेंट देय तारखेपूर्वी केले पाहिजे. लेट पेमेंट चार्जेस टाळण्यासाठी, क्लियर फंड्स पेमेंटच्या देय तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी आयडीबीआय बँक क्रेडिट कार्ड खात्यात जमा होणे आवश्यक आहे. कार्ड सदस्यांना सल्ला दिला जातो की लोकल चेक्स पेमेंटच्या देय तारखेच्या बरेच आधी जमा करावेत, जेणेकरून पेमेंटची नोंद देय तारखेपूर्वी कार्ड खात्यात होईल. मागील स्टेटमेंटमधील कोणतीही न भरलेली किमान देय रक्कम, कार्ड सदस्याच्या क्रेडिट लिमिट पेक्षा जास्त असलेल्या थकबाकीसोबत चालू किमान देय रकमे मध्ये जोडली जाईल.

ख. किमान देय रक्कम (MAD) गणनेचे उदाहरण:

कार्ड सदस्याने केलेल्या सर्व खर्चांची त्वरित परतफेड करण्याच्या जबाबदारीवर कोणताही परिणाम न होता, कार्ड सदस्याला स्टेटमेंटमध्ये नमूद केलेली किमान देय रक्कम (MAD) देय तारखेपर्यंत भरण्याचा पर्याय वापरता येईल. किमान देय रक्कम ही थकबाकी रकमेच्या ५% इतकी किंवा आयडीबीआय बँकेने आपल्या स्वतंत्र निर्णयानुसार निश्चित केलेली इतर कोणतीही रक्कम असेल.

जर कोणतीही परतफेड हस्त्यांद्वारे केली जात असेल, तर स्टेटमेंट कालावधीत देय असलेली हस्त्याची रक्कम किमान देय रकमे मध्ये जोडली जाईल. जर एकूण थकबाकी क्रेडिट मर्यादा किंवा रोख मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर त्या मर्यादेपेक्षा जास्त असलेली रक्कमही किमान देय रकमे मध्ये समाविष्ट केली जाईल. मागील स्टेटमेंटमधील न भरलेली किमान देय रक्कम असल्यास ती देखील किमान देय रकमे मध्ये समाविष्ट केली जाईल.

जरी किमान देय रक्कम भरलेली असली तरी, एकूण देय रक्कम देय तारखेपर्यंत न भरल्यास व्याज आकारले जाईल. जर ग्राहकाने क्रेडिट कार्ड परतफेडीसाठी ऑटो डेबिट सुविधा नोंदवली असेल आणि किमान देय रक्कम पर्याय निवडला असेल, तर ग्राहकाने देय तारखेपूर्वी कोणतीही रक्कम भरली नसल्यास देय तारखेला ती प्रक्रिया अंमलात आणली जाईल.

जर ग्राहकाने देय तारखेपूर्वी किमान देय रकमेपेक्षा कमी रक्कम भरली असेल, तर उर्वरित फरकाची रक्कम ग्राहकाच्या देय खात्यातून डेबिट केली जाईल. जर ग्राहकाने देय तारखेपूर्वी किमान देय रकमेइतकी किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम भरली असेल, तर ग्राहकाच्या देय खात्यातून कोणतीही अतिरिक्त रक्कम डेबिट केली जाणार नाही.

जर आपण ₹५,००० खर्च केले आणि दर महिन्याला केवळ किमान देय रक्कम भरली (किमान ₹100 पेक्षा कमी), तर संपूर्ण रक्कम परतफेड करण्यासाठी आपल्याला सुमारे ६ वर्षे आणि ६ महिने लागू शकतात. त्यामुळे, आपल्या कॅश फ्लो शक्य असेल तेव्हा किमान देय रकमेपेक्षा मोठी रक्कम परतफेड करण्याचा आम्ही सल्ला देतो.

जर कार्ड सदस्याने कार्डवरील थकबाकीपेक्षा जास्त रक्कम भरली, तर कार्ड खात्यात क्रेडिट शिल्लक निर्माण होईल. ही रक्कम पुढील कार्ड व्यवहारांशी समायोजित केली जाईल. तथापि, या अतिरिक्त क्रेडिट रकमेवर कोणतेही व्याज दावा करता येणार नाही.

समजा आपण आपल्या सर्व मागील देयकांची पूर्ण परतफेड केली आहे आणि आपल्या क्रेडिट कार्ड खात्यात कोणतीही थकबाकी नाही, तसेच आपले मासिक स्टेटमेंट दर महिन्याच्या २० तारखेला तयार केले जाते.

व्यवहाराची तारीख	प्रकार	क्रेडिट/ डेबिट	एमएडीचे योगदान	रक्कम
२५ सप्टेंबर	खरेदी	डेबिट	५%	₹५०००
१ ऑक्टोबर	वार्षिक शुल्क	डेबिट	१००%	₹१४९९
१ ऑक्टोबर	रोख रक्कम काढली	डेबिट	५%	₹२०००
१ ऑक्टोबर	कॅश विथड्रॉवल फी	डेबिट	१००%	₹५००
२० ऑक्टोबर	कॅश विथड्रॉवल वरील व्याज	डेबिट	१००%	₹३८.१४
२० ऑक्टोबर	जीएसटी	डेबिट	१००%	₹३६६,६८

किमान देय रक्कमे (MAD) ची खालीलप्रमाणे गणना केली जाईल:
एमएडी = (रिटेल खर्च + रोख आगाऊ रक्कम च्या ५% + शुल्क/आकारणीचे १००% + व्याज / वित्त शुल्कांचे १००% + ईएमआय रक्कम + जीएसटी एमएडी = ५% * (₹५००० + ₹२०००) + १००% * (₹१४९९ + ₹५००) + १००% * (₹३८.१४ + ₹३६६.६८) = ₹२७५३.८२
किमान देय रक्कम ₹२७५३.८२ असेल.

किमान देय रक्कम न भरल्याचे परिणाम:

जर ग्राहकाने देय तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी किमान देय रक्कम (MAD) भरली नाही, तर ग्राहकाकडून लागू दरांनुसार उशीर शुल्क आणि वित्त/सेवा शुल्के आकारली जातील. तसेच, देय तारखेपासून पेमेंटमध्ये झालेल्या विलंबाच्या दिवसांची योग्य संख्या आणि संबंधित रकमे सहित ग्राहकाची नोंद क्रेडिट माहिती कंपन्यांकडे (CICs) 'थकबाकीदार' म्हणून केली जाईल.

उदाहरण १: देय तारखेनंतर किमान देय रक्कम (**MAD**) भरणे

खालील उदाहरणामध्ये, पेमेंटच्या देय तारखेपर्यंत किमान देय रक्कम (**MAD**) न भरल्यास विविध शुल्कांची गणना कशी केली जाते हे दर्शविले आहे. असे गृहीत धरा की आपण आपल्या सर्व मागील देयकांची पूर्ण परतफेड केली आहे आणि आपल्या आयडीबीआय बँक क्रेडिट कार्डवर कोणतीही थकबाकी नाही. आपली स्टेटमेंट तारीख दर महिन्याच्या २० तारखेला आहे. खाली आपल्या कार्ड खात्यावर केलेल्या व्यवहारांची यादी दिली आहे.

दिनांक	तपशील	रक्कम
१० एप्रिल	गृहपयोगी वस्तूंची खरेदी	₹१५,०००/-
१५एप्रिल	कपडे आणि □क्सेसरीज ची खरेदी	₹५,०००/-
२०एप्रिल	स्टेटमेंटची तारीख	एकूण देय रक्कम = ₹२०,०००/- किमान देय रक्कम = ₹१,०००/-
८ मे	पेमेंट करण्याची तारीख	एकूण देय रक्कम = ₹२०,०००/- किमान देय रक्कम = ₹१,०००/-
१२ मे	कार्ड अकाऊंट मध्ये पेमेंट केले	₹२,०००/- (क्रेडिट)
१४ मे	गृहोपयोगी वस्तूंची खरेदी	₹१,०००/-
१५ मे	कार्ड अकाऊंट मध्ये पेमेंट केले	₹१५,०००/- (क्रेडिट)
२० मे	स्टेटमेंट ची तारीख	एकूण देय रक्कम = ₹५६६१.२६ किमान देय रक्कम = ₹१८६१.२६

ग्राहकाने देय तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी किमान देय रक्कम (MAD) भरली नसल्यामुळे, ग्राहकाची सर्व क्रेडिट माहिती कंपन्यांकडे (CICs) 'थकबाकीदार' म्हणून नोंद केली जाईल. याशिवाय, ग्राहकाकडून खालीलप्रमाणे शुल्क आकारले जाईल:
उशीर पेमेंट शुल्क – ₹७५०+ ₹१३५(१८% GST) = ₹८८५

वित्त / सेवा शुल्के – ₹१५००० वर २.९०% प्रति महिना दराने १० एप्रिल ते ११ मे (म्हणजे ३२ दिवस) पर्यंतचे व्याज = ₹४५७.६४ ₹१३००० वर २.९०% प्रति महिना दराने १२ मे ते १४ मे (म्हणजे ३ दिवस) पर्यंतचे व्याज = ₹३७.१८ ₹५००० वर २.९०% प्रति महिना दराने १५ एप्रिल ते १४ मे (म्हणजे ३० दिवस) पर्यंतचे व्याज = ₹१४३.०१ ₹३000 वर २.९०% प्रति महिना दराने १५ मे ते २० मे (म्हणजे ५ दिवस) पर्यंतचे व्याज = ₹१४.३० ₹१००० (नवीन खर्च) वर २.९०% प्रति महिना दराने १४ मे ते २० मे (म्हणजे ६ दिवस) पर्यंतचे व्याज = ₹५.७२

म्हणून एकूण व्याज = ₹६५७.८५+ ₹११८.४१ (१८% जीएसटी) = ₹७७६.२६

एकूण देय रक्कम = ₹४००० (₹२०,००० + ₹१००० - ₹२००० - ₹१५०००) + ₹८८५ + ₹७७६.२६ = ₹५६६१.२६

२० मेच्या स्टेटमेंटमधील किमान देय रक्कम ही रिटेल खरेदी / थकबाकी रकमेच्या ५% + १००% GST + १००% व्याज + १००% उशीर पेमेंट शुल्क याप्रमाणे असेल = ₹१८६१.२६ (₹२००(₹४०००* ५%) + ₹७५० + ₹६७५.८५+ ₹२५३.४१ = ₹१८६१.२६)

उदाहरण 2: देय तारखेपर्यंत / त्यापूर्वी एमएडी भरणे (परंतु एकूण देय रक्कम – टीएडी न भरल्यास)

खालील उदाहरणामध्ये, पेमेंटच्या देय तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी भरलेली रक्कम किमान देय रकमेइतकी किंवा त्यापेक्षा जास्त असली, परंतु एकूण देय रकमेपेक्षा कमी असल्यास विविध शुल्कांची गणना कशी केली जाते हे दर्शविले आहे. असे गृहीत धरा की आपण आपल्या सर्व मागील देयकांची पूर्ण परतफेड केली आहे आणि आपल्या आयडीबीआय बँक क्रेडिट कार्डवर कोणतीही थकबाकी नाही. आपली स्टेटमेंट तारीख दर महिन्याच्या २० तारखेला आहे. खाली आपल्या कार्ड खात्यावर केलेल्या व्यवहारांची यादी दिली आहे.

तारीख	तपशील	रक्कम
१०एप्रिल	गृहोपयोगी वस्तूंची खरेदी	₹१५,०००/-
१५ एप्रिल	कपडे आणि □क्सेसरीजची खरेदी	₹५,०००/-
२०एप्रिल	स्टेटमेंट ची तारीख	एकूण देय रक्कम = ₹२०,०००/- किमान देय रक्कम = ₹१,०००/-
१ मे	कार्ड अकाऊंट मध्ये पेमेंट केले	₹४,०००/-
८ मे	पेमेंट ड्यू डेट	एकूण देय रक्कम = ₹१६,०००/- किमान देय रक्कम = ०
१४ मे	गृहोपयोगी वस्तूंची खरेदी	₹१,०००/-
२० मे	स्टेटमेंटची तारीख	एकूण देय रक्कम = ₹१७,७९३.१६ किमान देय रक्कम = ₹१६४३.१६

ग्राहकाने देय तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी किमान देय रक्कम (Minimum Amount Due - MAD) भरल्यामुळे, ग्राहकाची सर्व क्रेडिट माहिती कंपन्यांकडे ‘थकबाकीदार’ म्हणून नोंद केली जाणार नाही.

ग्राहकावर आकारले जाणारे शुल्क खालीलप्रमाणे असेल:

उशीरा पेमेंट शुल्क – शून्य

वित्त / सेवा शुल्के –

₹१५०००वर २.९०% प्रति महिना दराने १० एप्रिल ते ३० एप्रिल (म्हणजे २१ दिवस) पर्यंतचे व्याज = ₹३००.३३ ₹११००० वर २.९०% प्रति महिना दराने ०२ मे ते २० मे (म्हणजे १९ दिवस) पर्यंतचे व्याज = ₹१९९.२६ ₹५००० वर २.९०% प्रति महिना दराने १५ एप्रिल ते २० मे (म्हणजे ३५दिवस) पर्यंतचे व्याज = ₹१६६.८५

₹१००० वर २.९०% प्रति महिना दराने १४ मे ते २० मे (म्हणजे ६ दिवस) पर्यंतचे व्याज = ₹५.७२

म्हणून एकूण व्याज = ₹६७२.१६ + ₹१२१.०० (१८% जीएसटी) = ₹७९३.१६

एकूण देय रक्कम=₹१७,०००(₹२०,०००+₹१०००-₹४०००)+₹६७२.१६+₹१२१ = ₹१७,७९३.१६

२० मेच्या स्टेटमेंटमधील किमान देय रक्कम ही रिटेल खरेदी / थकबाकी रकमेच्या ५% + १००% जीएसटी + १००% व्याज याप्रमाणे असेल = ₹१६४३.१६ (₹८५० (₹१७०००* ५%) + ₹६७२.१६+ ₹१२१ = ₹१६४३.१६)

उदाहरण ३: देय तारखेपूर्वी/देय तारखेला MAD चे पेमेंट (TAD पूर्णपणे भरल्यास)

खालील उदाहरणामध्ये देय तारखेपर्यंत एकूण देय रक्कम भरल्यास विविध शुल्कांची गणना करण्याची पद्धत दर्शवली जाईल. असे गृहीत धरा की आपण सर्व मागील देयके पूर्णपणे भरली आहेत आणि आपल्या आयडीबीआय बँक क्रेडिट कार्डवर कोणतीही थकबाकी नाही. आपल्या स्टेटमेंटची तारीख प्रत्येक महिन्याच्या २० तारखेला आहे. खाली आपल्या कार्ड खात्यावर केलेल्या व्यवहारांची यादी दिली आहे.

दिनांक	तपशील	रक्कम
१०एप्रिल	गृहोपयोगी वस्तूंची खरेदी	₹१५,०००/-
१५ एप्रिल	कपडे आणि □क्सेसरीजची खरेदी	₹५,०००/-
२०एप्रिल	स्टेटमेंटची तारीख	एकूण देय रक्कम = ₹२०,०००/- किमान देय रक्कम = ₹१,०००/-
१ मे	कार्ड अकाऊंट मध्ये पेमेंट केले	₹ २०,०००/-
८ मे	पेमेंट ड्यू डेट	एकूण देय रक्कम = ० किमान देय रक्कम = ०
१४ मे	गृहोपयोगी वस्तूंची खरेदी	₹१,०००/-
२० मे	स्टेटमेंट ची तारीख	एकूण देय रक्कम = ₹१००० किमान देय रक्कम = ₹ ५०

२० मे पर्यंत (म्हणजे पुढील स्टेटमेंटच्या तारखे पर्यंत) कार्डवर कोणतेही पुढील पेमेंट केले जात नाही. कार्डवरील दरमहा २.९०% व्याजदर गृहीत धरल्यास, व्याज आणि शुल्क खालीलप्रमाणे आकारले जातील:

i) व्याज शुल्क - शून्य ii) जीएसटी शुल्क - शून्य iii) एकूण थकबाकी रक्कम = ₹१,००० त्यामुळे, २० मेच्या स्टेटमेंटमध्ये देय एकूण रक्कम (i) + (ii) + (iii) = ₹१,००० असेल.

(c) जर देय तारखेपूर्वी पेमेंट IDBI बँक क्रेडिट कार्ड खात्यात जमा झाले नाही, तर बँक आपल्या पूर्ण विवेकाधिकाराने कार्डचा पुढील वापरासाठी ब्लॉक करू शकते.

(d) कार्डवरील थकबाकीकडे केलेल्या पेमेंटची नोंद पुढील स्टेटमेंटमध्ये दर्शविली जाईल.

(e) कार्ड सदस्याने दिलेल्या कोणत्याही पेमेंट सूचनेची नंतर पूर्तना झाली नाही तर, बँकेच्या पूर्ण विवेकाधिकाराने कार्डच्या सुविधा निलंबित / समाप्त केल्या जाऊ शकतात आणि फी व शुल्कांच्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्क कार्ड खात्यावर आकारले जाईल. अशा शुल्काच्या रकमेतील बदल करण्याचा अधिकार देखील पूर्णपणे बँकेकडे राहील. तसेच, योग्य कायदेशीर कारवाई सुरू करण्याचा अधिकारही बँकेने राखून ठेवला आहे.

((f) डुप्लिकेट मासिक खाते विवरणपत्रे बँकेकडून कार्ड सदस्याला अशा विनंतीपूर्वीच्या केवळ बारा महिन्यांच्या कालावधीपर्यंतच दिली जातील, त्यासाठी शुल्क व आकारणीच्या वेळापत्रकात नमूद केलेल्या सेवा शुल्काचा भरणा करणे आवश्यक असेल आणि हे शुल्क बँकेच्या विवेकाधिकारानुसार बदलले जाऊ शकते.

(g) तुमच्या संपर्क पत्त्यात / ई-मेल पत्त्यात / मोबाईल क्रमांकात कोणताही बदल झाल्यास, तुम्हाला नियमितपणे आणि वेळेवर स्टेटमेंट्स मिळावीत यासाठी कृपया तत्काळ बँकेशी संपर्क साधून ती माहिती अद्ययावत करण्याचा सल्ला दिला जातो.

(h) कार्ड खात्याकडे देयके खालीलपैकी कोणत्याही प्रकारे केली जाऊ शकतात:

१. ऑटो-डेबिट सुविधा - दर महिन्याला आपल्या आयडीबीआय बँकेच्या बचत/चालू खात्यातून थेट एकूण देय रक्कम / किमान देय रक्कम वजा करण्यासाठी आयडीबीआय बँकेला अधिकृत करा आणि आपल्या कार्ड खात्यात रक्कम जमा केली जाईल.

२. नेट बँकिंग – आयडीबीआय बँकेच्या नेट बँकिंगद्वारे आपल्या आयडीबीआय बँकेच्या बचत/चालू खात्यातून थेट डेबिट करून क्रेडिट कार्डची थकबाकी भरा.

३.एनईएफटी - आपल्या आयडीबीआय बँकेच्या क्रेडिट कार्ड बिलाचे ऑनलाइन पेमेंट करण्यासाठी एनईएफटी सुविधा असलेले इतर बँक खाते वापरा. आयएफएसी कोड "IBKL0NEFT01" वापरा आणि बँकेचे नाव "आयडीबीआय बँक लिमिटेड" तसेच लाभार्थी खाते क्रमांक म्हणून क्रेडिट कार्ड क्रमांक जोडा.

४. धनादेश / डिमांड ड्राफ्ट – आयडीबीआय बँकेची शाखा आणि एटीएम मध्ये ठेवलेल्या कोणत्याही आयडीबीआय बँकेच्या ड्रॉप बॉक्समध्ये आपला धनादेश/डिमांड ड्राफ्ट टाका. धनादेश/डिमांड ड्राफ्ट हा <कार्डवर छापलेल्या नावानुसार> यांच्या IDBI Bank कार्ड क्रमांक xxxx-xxxx-xxxx-xxxx यांच्या नावे देय असावा.

५. रोख – कोणत्याही आयडीबीआय बँकेच्या संपूर्ण भारतातील शाखेत प्रत्यक्ष जाऊन कार्ड क्रमांक, रक्कम आणि संपर्क क्रमांक पे-इन स्लिपमध्ये नमूद करून क्रेडिट कार्डची थकबाकी भरा.

६. आयपे – अन्य कुठल्याही बँकेच्या खात्यातून तुम्ही थेट ऑनलाईन पेमेंट करु शकता.

७. व्हिसा मनी ट्रान्सफर - व्हिसा फ्रँचायझी क्रेडिट कार्डांच्या बाबतीत, इतर बँक खात्याचा वापर करून व्हिसा मनी ट्रान्सफरद्वारे ऑनलाइन पेमेंट करा. व्हिसा मनी ट्रान्सफरसाठी शुल्क सुरुवात करणाऱ्या बँकेद्वारे आकारले जाऊ शकते.

टीप: कार्डधारकांना सूचित करण्यात येते की पेमेंटची रक्कम पेमेंट देय तारखेच्या खूप आधी भरावी, जेणेकरून पेमेंटचे क्रेडिट पेमेंट देय तारखेपूर्वी किंवा त्या दिवशी दिसून येईल. कार्डधारकांनी त्यांच्या क्रेडिट कार्डची थकबाकी वरील नमूद केलेल्या पद्धतींद्वारे भरावी. आयडीबीआय बँकेशी संलग्न नसलेल्या कोणत्याही तृतीय-पक्ष ॲप्ससह इतर पद्धती/चॅनेलद्वारे केलेल्या पेमेंटला क्लिअरन्ससाठी अधिक टीएटी (वेळ) लागू होऊ शकतो. देय तारखेपर्यंत निधी प्राप्त न झाल्यास, कार्डच्या प्रकारानुसार लागू असलेले शुल्क आकारले जाईल. संलग्न नसलेल्या चॅनेलद्वारे केलेल्या पेमेंटच्या विलंबित/न दिसणाऱ्या नोंदीबाबत कोणतीही चौकशी असल्यास, ग्राहकांनी संबंधित चॅनेलशी थेट संपर्क साधावा.

(c) बिलिंग विषयी समस्या: स्टेटमेंट दिनांकापासून ६० दिवसांच्या आत कार्डधारकाने लेखी स्वरूपात बिलातील विसंगतींबाबत आयडीबीआय बँके ला माहिती दिली नाही तर स्टेटमेंटमधील सर्व मजकूर योग्य व स्वीकारलेला मानला जाईल:

- पोस्टद्वारे: व्यवस्थापक, आयडीबीआय बँक लि., सीपीयू - क्रेडिट कार्ड्स विभाग, आयडीबीआय बिल्डिंग, ३रा मजला, प्लॉट क्र.: ३९/४०/४१, सेक्टर-११, सीबीडी -बेलापूर, नवी मुंबई, पिन-४००६१४.
- ईमेलद्वारे: customercare@idbi.co.in

अशी माहिती प्राप्त झाल्यावर, आयडीबीआय बँके तर्फे तपासणी प्रलंबित असताना तात्पुरत्या स्वरूपात शुल्क परत करू शकते. पुढील तपासणी पूर्ण झाल्यानंतर, जर अशा शुल्कांची जबाबदारी कार्डधारकाच्या खात्यावर येत असेल, तर ते शुल्क पुढील स्टेटमेंटमध्ये संबंधित पुनर्प्राप्ती विनंती शुल्कांसह पुन्हा आकारले जाईल.

(c) संपर्क तपशील: कार्ड सदस्य कोणत्याही चौकशीसाठी किंवा तक्रार निवारणासाठी आयडीबीआय बँक क्रेडिट कार्ड्सशी खालील मार्गांनी संपर्क साधू शकतात:

- २४ तास क्रेडिट कार्ड ग्राहक सेवा -
- 1800-209-4324 / 1800-22-1070 (टोल फ्री) / 022 67719100 (नॉन-टोल फ्री)
- पोस्टद्वारे - मॅनेजर, आयडीबीआय बँक लिमिटेड, सीपीयू - क्रेडिट कार्ड्स विभाग, आयडीबीआय बिल्डिंग, ३ रा मजला, प्लॉट क्र.: ३९/४०/४१, सेक्टर-११, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई, पिन-४००६१४.
- ईमेलद्वारे - customercare@idbi.co.in

ङ) **<u>डीफॉल्ट आणि अन्य परिस्थिती</u>**

- जर कार्ड मेंबरने बिलिंग स्टेटमेंटमध्ये नमूद केलेल्या देय तारखेपर्यंत किमान देय रक्कम भरली नाही, तर ते थकबाकी मानले जाईल. अशा परिस्थितीत, जर कार्ड मेंबरने पुढील बिलिंग तारखेपर्यंतही पेमेंट केले नाही, तर बँक डिफॉल्टचा अहवाल क्रेडिट माहिती ब्युरो किंवा कायद्याने मान्य केलेल्या इतर संस्थांकडे पाठवू शकते. दोन बिलिंग तारखांमधील कालावधी हा कार्ड मेंबरला डिफॉल्टर म्हणून नोंदवण्यासाठीचा नोटीस कालावधी मानला जातो.
- कार्डधारक करारातील/अत्यंत महत्त्वाच्या अटी व शर्तींमधील कोणत्याही इतर कलमात नमूद केलेल्या कोणत्याही विसंगती असूनही, पुढे असे स्पष्ट करण्यात येते की जर कार्डधारकाने सलग 90 दिवसांसाठी किमान देय रक्कम भरली नाही, तर या कराराअंतर्गत IDBI बँकेद्वारे प्रदान केली जाणारी

क्रेडिट कार्ड सेवा समाप्त मानली जाईल, तरीही कार्डधारक ९० दिवसांनंतरही कोणतीही न भरलेली रक्कम तसेच कोणतेही वित्त शुल्क/उशिरा केलेल्या देयकावरील व्याज यासर्वांसाठी जबाबदार राहील, जे आयडीबीआय बँक तिच्या एकमेव स्वविवेकाधिकाराने आणि पर्यायाने तसेच तिच्या विविध अंतर्गत धोरणे व कार्यपद्धतींनुसार, देय तारखेपासून ९० दिवसांनंतरच्या कालावधीसाठी आकारू शकते.

- कार्डचे देयक कार्ड धारकांच्या करारात ठरलेल्या अटींनुसार/ देय तारखांना भरणे अपेक्षित आहे. डीफॉल्ट झाल्यास, क्रेडिट कार्ड खात्यातील कोणतेही थकित देयक भरण्यासाठी कार्डधारकास वेळोवेळी पोस्ट, फॅक्स, टेलिफोन, ई-मेल, एसएमएस संदेश आणि/किंवा वसुलीच्या उद्देशाने नेमलेल्या तृतीय पक्षांद्वारे स्मरणपत्रे पाठवली जातील, ज्याद्वारे देयकांची आठवण करून देणे, पाठपुरावा करणे आणि वसुली करणे इत्यादी केले जाईल. अशा प्रकारे नेमलेला कोणताही तृतीय पक्ष कर्ज वसुलीबाबत भारतीय बँक संघटना (आयबीए) च्या आचारसंहितेचे पालन करेल. जर बँकेला कार्ड सदस्याशी संपर्क साधता आला नाही, तर घर/कार्यालय/फोनवर उपलब्ध असलेल्या तृतीय पक्षांसोबत जसे की जोडीदार / पालक / इतर थेट प्रौढ कुटुंब सदस्य / सचिव / लेखापाल यांच्याकडे संदेश ठेवला जाऊ शकतो.

कार्डधारकाच्या मृत्यूच्या प्रकरणात थकबाकीची वसुली:

· संपूर्ण थकबाकी (बिल न केलेल्या व्यवहारांसह) त्वरित देय होईल आणि ती आयडीबीआय बँकेला भरावी लागेल.

· कार्डधारकाच्या संपत्तीमधून एकूण थकबाकी वसूल करण्याचा अधिकार आयडीबीआय बँकेला प्राप्त होईल.

